पुण्य नगरी
नगरी
शुक्रवार, १० ऑक्टोबर २०२५ ■ कोल्हापूर

# विवेकानंद महाविद्यालयामध्ये वन्यजीव सप्ताह उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय वन्यजीव सप्ताह दि. १ ते ४ ऑक्टोबरदरम्यान उत्साहात साजरा करण्यात आला.

या वर्षीच्या थिमद्वारे वन्यजीव संवर्धनासाठी आर्थिक गुंतवणुकीचे महत्त्व आणि निसर्ग व मानव यांच्यातील संतुलन राखण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. सप्ताहादरम्यान रांगोळी, प्राणी छायाचित्रण, क्राफ्ट मॉडेल, पोस्टर सादरीकरण, फेस अँड हँड पेंटिंग, प्रश्नमंजूषा आणि लघुचित्र अशा विविध स्पर्धा झाल्या. समारोपप्रसंगी इकोएंसा, पुणे येथील पर्यावरण सल्लागार डॉ. श्रुती कुलकर्णी यांचे प्रेरणादायी अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. हा उपक्रम प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. १७० विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला, तर सुमारे ३०० विद्यार्थी आणि ५५ शिक्षकांनी भेट देऊन कार्यक्रमाला प्रतिसाद दिला. कार्यक्रमानंतर सर्व विजेते आणि सहभागी विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

10-25